## ६ .भारत आणि जग

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**(१) अलिप्ततावादाचा गाभा हा आहे-**

**<u>(अ) जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन</u>**
(ब) शीतयुद्धात सहभाग
(क) लोकशाही समाजवाद एक धोरण
(ड) प्रादेशिकतावादाचे धोरण

**(२) भारताने नदी पाणी वाटपाबाबत फराक्का करार या देशाबरोबर केला आहे-**

**<u>(अ) बांगलादेश</u>**
(ब) पाकिस्तान
(क) चीन
(ड) नेपाळ

**(ब) गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(a) NATO - युरोप

(b) ANZUS -आफ्रिका

(c) SEATO -दक्षिण पूर्व आशिया

(d) CINTO -पश्चिम आशिया

**उत्तरे: दुरुस्त जोड्या**
(b) ANZUS - Australia, Newzealand, United States

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

**(१) म्यानमार हा भारताचा पारंपरिक मित्र आहे.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.
**कारण:** भारताच्या पूर्वेकडे असलेल्या या देशाबरोबर भारताचे प्राचीन काळापासून सांस्कृतिक व व्यापारी संबंध होते.

**(२) १९९० नंतर बदललेल्या जागतिक व्यवस्थेत दहशतवादाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
कारण : १९९० च्या बदललेल्या जागतिक व्यवस्थेत आर्थिक वृद्धीसाठी जागतिकीकरण हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

**(३) सागरमाला या योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास अभिप्रेत आहे.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.

**कारण:** 'सागरमाला' ही बंदराधारित विकासाची योजना आहे.

**प्र. ३ आपले मत नोंदवा.**

**(१) हिंदी महासागरात भारताची भूमिका.**
**उत्तर:** (१) हिंदी महासागरात भारताचे स्थान मध्यवर्ती आहे.
(२) पश्चिम, दक्षिण आणि आग्नेय आशियातील देशांसाठी प्राचीन काळापासून भारताचे स्थान महत्त्वाचे आहे.
(३) प्राचीन काळापासून या देशांबरोबर भारताचे सांस्कृतिक व व्यापारी संबंध आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात हे संबंध दृढ करण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे.
(४) आफ्रिका खंडातील वंशवाद आणि वसाहतवादाला भारताने सातत्याने विरोध केला आहे. या खंडातील देशांच्या स्वातंत्र्य लढ्याला आणि त्यानंतरच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला भारताने पाठिंबा दिला आहे.

**प्र.४ खलील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**(१) भारत-आफ्रिका संबंधावर टीप लिहा.**
**उत्तर:** (१) पूर्व आणि दक्षिणी आफ्रिकी देशात मिळून भारतीय वंशाचे सुमारे दोन कोटी लोक राहतात. वंशभेदाच्या धोरणाविरुद्ध गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह केला.
(२) भारताने आफ्रिका खंडातील वसाहतवाद-विरोधी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनास सातत्याने पाठिंबा दिला आहे.
(३) आफ्रिका खंडातील खनिज तेल आणि अन्य व्यवसायांत भारतीय उद्योजकांनी भांडवली गुंतवणूक केली आहे.
(४) हरारे येथील अलिप्ततावादी संघटनेच्या शिखर परिषदेत आफ्रिकन देशांसाठी 'आफ्रिका फंड' उभारण्यात भारताने पुढाकार घेतला होता.
(५) भारतातील सैनिकी प्रशिक्षण संस्थांमध्ये आफ्रिकी देशातील सैन्याधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. प्र.४ खलील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**(२) मारत-चीन संबंधांवर थोडक्यात चर्चा करा.**
**उत्तर:** (१) १९४९ साली साम्यवादी क्रांतीनंतर चीनला भारताने राजनयिक मान्यता दिली. प्रारंभीच्या काळात या दोन देशांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. १९५४ मध्ये या दोन देशांनी व्यापार आणि सहकार्याचा करार केला, ज्यायोगे भारताने तिबेटवरील चीनच्या सार्वभौमत्व मान्यता दिली.
(२) त्यानंतरच्या काळात सीमावादावरून १९६२ साली झालेल्या भारत-चीन युद्धात भारताचा पराभव झाला आणि त्यांनी राजनयिक संबंध तोडले.
(३) १९७६ मध्ये भारत आणि चीनमधील राजनयिक संबंध पुन्हा प्रस्थापित झाले आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याचे प्रयत्न झाले. सीमा विवाद सोडवण्यासाठी संयुक्त कार्यगटांची स्थापना करण्यात आली. दोन्ही देशांदरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांतता व सौदाहपूर्ण वातावरण राखण्याचा करार झाला.
(४) १९९० च्या दशकात चीनचा महासत्ता म्हणून उदय झाला.
गेल्या दोन दशकात दोहोंदरम्यानचे व्यापारी संबंध वृद्धिंगत झाले आहेत. आज चीन भारताच्या सर्वांत मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक आहे.
(५) चीनच्या महत्त्वाकांक्षी "बेल्ट अॅड रोड" प्रकल्पाविषयी भारताचे काही आक्षेप असले तरीही जागतिक व्यापारी संघटना आणि वातावरण बदल वाटाघाटीत ते एकमेकांचे भागीदार आहेत.
(६) चीनचा पाकिस्तानला असलेला पाठिंबा हीदेखील भारतासाठी एक समस्याच आहे,

**प्र.५ पुढील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

**भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक पुढील मुद्द्यांच्या आधारे सविस्तर लिहा.**

**(अ) भौगोलिक घटक**
**(ब) ऐतिहासिक घटक**
**(क) आर्थिक घटक**
**(ड) राजकीय घटक**
**(इ) आंतरराष्ट्रीय व्यवस्था**

**उत्तर:** भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणाऱ्या घटकांचे
विवरण पुढीलप्रमाणे:
**(अ) भौगोलिक घटक:** दक्षिण भारताची विस्तृत किनारपट्टी, तसेच उत्तर आणि ईशान्येकडील हिमालय पर्वताच्या रांगा यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार दिला आहे. उत्तर आणि ईशान्य सीमेपलीकडे चीनसारखा मोठा देश असणे, याचाही परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला आहे. शेजारी देशांची भारताबरोबर सीमा आहे.भारताचे हिंदी महासागरात महत्त्वाचे स्थान आहे.
**(ब) ऐतिहासिक घटक:** शांतता आणि सहजीवन या भारताच्या पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांचा आणि पश्चिम, मध्य आणि आग्नेय आशियातील देशांबरोबरील ऐतिहासिक, सांस्कृतिक संबंधाचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला आहे. वसाहतवाद आणि वर्णभेदाला विरोध ही मूल्ये भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात दरम्यान उद्भवली.
**(क) आर्थिक घटक:** वासाहतिक काळापासून चालत आलेल्या गरिबी आणि मागासलेपणातून बाहेर येण्याची तीव्र गरज भारताला जाणवत होती. सशर्त आर्थिक मदत भारताने नाकारली. आयात- पर्यायी धोरण आणि सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर मोठा परिणाम झाला.१९९१ नंतर ठदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण अवलंबल्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक मूलभूत बदल घडून आले.
**(ड) राजकीय घटक:** भारताचे परराष्ट्र धोरण बनवण्यात आणि राबवण्यात राजकीय नेतृत्वाचा मोठा प्रभाव असतो. जवाहरलाल नेहरू ते नरेंद्र मोदी या प्रधानमंत्र्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण घडवण्यात निर्णायक भूमिका बजावली आहे. परराष्ट्र मंत्रालय आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचीही भूमिका महत्त्वपूर्ण आहे.
**(ई) आंतरराष्ट्रीय व्यवस्था:** शीतयुद्धाच्या काळात द्विध्रुवीय व्यवस्था आणि महासत्तांचे राजकारण यांचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला. शीतयुद्ध संपल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात मोठे बदल घडले. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेप्रमाणे क्षेत्रीय व्यवस्थेचाही भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला आहे.